महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

जा.क्रं. / प्रेस नोट/166/ पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड /2025 दिनांक : 23/04/2025

# नांदेड पोलीस व महानगर पालीका यांचे समन्वयाने शहरातील हबीब टॉकीज चौक ते बर्की चौक येथील अवैध अतिक्रमण धारक यांचेवरती धडक कारवाई..

**मा. श्री. अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी शहरात वाढत असलेली ट्राफिक समस्या अटोक्यात आणनेसाठी तसेच शहरातील रस्त्यावरील अवैध अतिक्रमणामुळे सर्वसामान्य नागरीक व वाहतुकीस होत असलेले नाहक त्रास यामुळे रस्त्यावरील अवैध अतिक्रमण हटविण्यासाठी मोहीम राबविने बाबत आदेशीत केले होते.

त्या अनुषंगाणे आज दिनांक 23.04.2025 रोजी चे सकाळी 10.00 वा. पासुन मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री/सुशील कुमार नायक, उप विभाग, इतवारा, पोलीस निरीक्षक श्री. संजय शिंदे, पोलीस स्टेशन, इतवारा यांनी नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका यांचेशी समन्वय साधुन त्यांचे समवेत **हबीब टॉकीज चौक ते बर्की चौक** या मार्गावरील अवैध अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविणे चालु आहे.

सदर **हबीब टॉकीज चौक ते बर्की चौक** या रस्त्यावरील अतिक्रमण काढणेबाबतचे मोहीमे दरम्याण अवैध अतिक्रमण, गाडे, फलक, बॅनर व इतर अशा **अवैध अतिक्रमण धारकांवर आतापर्यंत एकुण 25** कारवाया करण्यात आल्या आहेत. अवैध अतिक्रमण हटविण्यात आलेले सामान महानगरपालीकेकडुन जप्त करण्यात येत आहे.

सदर अवैध अतिक्रमण मोहीमेमध्ये नांदेड वाघाळा शहर महानगरपालीका उप–आयुक्त श्री अजितपालसिंग संधु, सहाय्यक आयुक्त श्री सोनसळे, महानगरपालीकेचे 07 अधिकारी, 48 कर्मचारी असे सहभागी झाले होते. नांदेड पोलीस प्रशासनातील उप–विभागीय पोलीस अधिकारी, इतवारा श्री/सुशिल कुमार नायक, पोलीस निरीक्षक श्री. संजय शिंदे, पो स्टे इतवारा, पो स्टे इतवारा येथील 04 अधिकारी, 15 अंमलदार, राज्य राखीव पोलीस दलाचे 01 प्लाटुन, दंगल नियंत्रण पथकाचे एक प्लाटुन असे हजर असुन कार्यवाही करणे चालुच आहे.

**मा. श्री. अबिनाश कुमार**, पोलीस अधीक्षक, नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली शहरातील अवैध अतिक्रमण हटविण्याची मोहीम यापुढे सुरू राहणार असून यापुढे कोणीही वाहतूकीस अडथळा निर्माण होईल असे अवैध अतिक्रमण करू नये केल्यास संबधीतांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल असे पोलीस प्रशासनाव्दारे आवाहन करण्यात आले आहे.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड